महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४ दिनांक : २६-०८-२०२२

## परिपत्रक क्र.१

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (Govt. ITI) विविध व्यवसायातील शिल्प निदेशक (Craft Instructor) (गट-क) संवर्गातील पदभरती करिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दि.१७/०८/२०२२ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने उमेदवारांना सूचित करण्यात येते की, शिल्प निदेशक पदाकरिता सामायिक परीक्षा व व्यावसायिक चाचणी अशा दोन परीक्षा असून सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार सामायिक परीक्षेत ४५ टक्के अथवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त केलेले उमेदवार व्यावसायिक चाचणीकरिता पात्र ठरणार आहेत. यास्तव, प्रथम टप्प्यात ऑनलाईन अर्ज स्विकारतांना उमेदवाराचे CTI/CITS/NCIC प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र स्विकारण्यात आलेले नाही. सामायिक परीक्षेअंती व्यावसायिक चाचणीकरिता पात्र ठरणाऱ्या उमेदवारांकडून दुसऱ्या टप्प्यात ऑनलाईन अर्ज स्विकारतांना उमेदवार ज्या पदांकरिता पात्र ठरेल त्या पदाकरिता विहित केलेले CTI/CITS/NCIC प्रशिक्षण उमेदवाराने यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र स्विकारण्यात येणार आहे याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
( दि. अं. दळवी )
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.